# नियमित दिवाणी दावा क्र.३०/२०२२ मधील निशाणी ०५ वरील आदेश

# (CNR MHWS04000787-2022)

वादींनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ३९ नियम १ व २ अन्वये दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकतींमध्ये त्रयस्थ व्यक्तींचे हितसंबंध निर्माण करु नयेत असा तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

वादींचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे–

**०२.** वादींनी प्रस्तुतचा दावा हा मौजे सोनखास, ता. मंगरुळपीर जि. वाशिम येथील शेत गट क्र. १४ (जुना सर्व्हे क्र. ९/१) क्षेत्र ७ हेक्टर ५७ आर व मौजे मंगरुळपीर ता. मंगरुळपीर, जि. वाशिम येथील नगर पंचायत मालमत्ता क्र.७४ क्षेत्र ६५८ चौरस फुट व ७४/१ क्षेत्र ७०२ चौरस फुट या मिळकतींबाबत सरसनिरस वाटप व ताब्यासाठी दाखल केलेला आहे. (सदर मिळकतींना यापुढे दावा मिळकती असे संबोधण्यात येईल). प्रतिवादी क्र. ०१ हे वादींचे वडील आहेत. दावा मिळकती या विठ्ठलसिंह जयरामसिंह रघुवंशी (ठाकुर) यांच्या वडीलोपार्जीत मिळकती आहेत. विठ्ठलसिंह यांना त्यांच्या मृत्यूवेळी प्रतिवादी क्र. ०१, विजयसिंह उर्फ भिष्मधारसिंह व मुलगी दुर्गाबाई असे तिन अपत्य होते. दिनांक ३०.०९.१९९५ रोजी विठ्ठलसिंह यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूनंतर दावा मिळकती त्यांच्या तिन्ही मुलांच्या वापरात आल्या. सन २००५ साली त्यांनी दावा मिळकतींची विभागणी केली. त्या विभागणीमध्ये त्यांच्यामध्ये ठरल्याप्रमाणे विजयसिंह यांनी जुना वार्ड क्र. १७ मधील मंगरुळपीर नगर परिषद हद्दीतील तिन मजली घर घेवून त्याच्या बदल्यात दावा मिळकतींमधील त्यांचा १/३ हिस्सा प्रतिवादी क्र.०१ यांच्या हक्कात सोडुन दिला. तसेच त्या विभागणीमध्ये ठरल्याप्रमाणे दुर्गाबाई यांनी मौजे शहापूर ता. मंगरुळपीर येथील १० एकर शेत जमीन घेवून दावा

मिळकतींमधील त्यांचा १/३ हिस्सा प्रतिवादी क्र. ०१ यांच्या हक्कात सोडुन दिला. दावा मिळकती त्याप्रमाणे कायदेशीररित्या वादी व प्रतिवादींना मिळालेल्या आहेत व त्यांच्या वडीलोपार्जीत मालमत्ता आहेत.

**०३.** वादींचे पुढे असे कथन आहे की, सन १९७९ साली प्रतिवादी क्र. ०१ यांचे प्रतिवादी क्र. ०२ यांच्यासोबत लग्न झाले. वादी क्र. ०२ हा त्यांच्या विवाह संबंधातून झालेला मुलगा आहे. सन १९८१ साली प्रतिवादी क्र. ०२ दुस–यांदा गर्भवती असतांना प्रतिवादी क्र. ०१ व ०२ यांच्यामध्ये वाद झाला व तेव्हापासून प्रतिवादी क्र. ०२ माहेरी राहत होती. त्यावेळी वादी क्र. ०१ याचा जन्म झालेला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ यांचे शांतीबाई यांच्यासोबत विवाहबाहय संबंध जुळले. प्रतिवादी क्र. ०२ सोबत वैवाहीक संबंध कायम असतांना प्रतिवादी क्र. ०१ यांना शांतीबाई यांच्यापासून प्रतिवादी क्र. ०४ हा मुलगा व प्रतिवादी क्र. ०५ मुलगी अशी अपत्य आहेत. वादी क्र. ०१ हे प्रतिवादी क्र. ०२ यांच्यासह सनाच्यावेळी मंगरुळपीर येथे प्रतिवादी क्र. ०१ यांच्या घरी राहतात. सन २००५ साली दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या एकत्रीत कुटुंबाच्या ताब्यात आल्यापासून अदयापर्यंत दावा मिळकतींबाबत वाटप झालेले नाही. प्रतिवादी क्र. ०१ व ०४ हे दावा मिळकती विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. वादींनी फेब्रुवारी २०२२ मध्ये दावा मिळकतींचे वाटप करुन मागितले असता प्रतिवादी क्र. ०१ याने त्यास नकार दिला. त्यामुळे वादींना दावा दाखल करणे भाग पडले. तसेच दाव्याच्या निकालापर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकतींमध्ये त्रयस्थ व्यक्तींचे हितसंबंध निर्माण करू नयेत अथवा दावा मिळकती विक्री करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्याची मागणी केली आहे.

**०४.** प्रतिवादी क्र. ०१ व ०४ हे दाव्यात हजर झाले व त्यांनी निशाणी २२ कडे दाव्यास लेखी कैफियत व प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. सन २००५ साली विठ्ठलसिंह यांचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र. ०१,

विजयसिंह व दुर्गाबाई यांच्यामध्ये झालेले वाटप त्यांना मान्य आहे. त्यांच्या कथनानुसार, दावा मिळकतींमधील त्यांचे हक्क विजयसिंह व दुर्गाबाई यांनी प्रतिवादी क्र. ०१ यांच्या हक्कात सोडुन दिल्यामुळे दावा मिळकती या प्रतिवादी क्र. ०१ यांच्या स्वकष्टार्जीत मिळकती आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ०२ ही प्रतिवादी क्र. ०१ यांची पत्नी असल्याचे, सन १९८१ साली प्रतिवादी क्र. ०२ गर्भवती असतांना माहेरी गेल्याचे त्यांना मान्य आहे. त्यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. ०१ यांनी प्रतिवादी क्र. ०२ यांच्या विरुध्द फारकत मिळण्याकरीता दावा दाखल केला होता व तो मंजुर करण्यात आलेला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ यांनी शांतीबाई यांच्यासोबत कायदेशीर लग्न केले व त्या संबंधातून त्यांना प्रतिवादी क्र. ०४ व ०५ अशी अपत्य आहेत. सन १९८१ नंतर वादी, प्रतिवादी क्र. ०२ हे कधीही मंगरुळपीर येथे आले नाहीत. शांतीबाई यांना प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार समाविष्ठ केलेले नाही. त्यामुळे दावा व प्रस्तुतचा अर्ज खारीज करण्याची विनंती ते करतात.

**०५.** प्रतिवादी क्र. ०२, ०५, ०६ हे दाव्यात हजर झाले, परंतु त्यांनी त्यांची लेखी कैफियत अथवा प्रस्तुत अर्जावर म्हणणे सादर केले नाही. प्रतिवादी क्र. ०३ यांना निशाणी २९ कडील आदेशान्वये वादी क्र. ०२ म्हणून समाविष्ठ करण्यात आले.

**०६.** वादींचे विद्वान वकील श्री. येवले व श्री. नाकाडे आणि प्रतिवादी क्र. ०१ व ०४ यांचे विद्वान वकील श्री. राठी यांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांनी केलेला युक्तीवाद, त्यांचे कथन व अभिलेखावर दाखल करण्यात आलेले कागदपत्रे यांचा विचार करता प्रस्तूतचा अर्ज निकाली काढण्यासाठी खालील वादप्रश्न विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. सदरील वादप्रश्न व त्यावरील निष्कर्ष खाली नमूद कारणासह नोंदविलेले आहेत.

| अ. क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सकृतदर्शनी बाजू वादींच्या हक्कात आहे हे वादी सिद्ध करतात काय? | ... होय. |
| २. | दाव्याचा समतोल वादींच्या हक्कात असल्याचे वादी सिद्ध करतात काय? | ... होय. |
| ३. | वादींच्या हक्कात तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश पारीत न केल्यास त्यांचे कधीही भरून न येणारे नुकसान होणार असल्याचे वादी सिद्ध करतात काय? | ... होय. |
| ४. | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र. १ ते ३ करिता:-**

**०८.** आदेश ३९ नियम १ व २ अन्वयेचा अर्ज विचारात घेताना न्यायालय शपथपत्र व अन्य कागदपत्रे विचारात घेऊ शकते सकृतदर्शनी केस सिद्ध करण्याकरिता वादींना दाव्याच्या गुणदोषावरील चौकशीअंती सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. केवळ एका गंभीर व प्रमाणिक वाद दाव्याच्या न्याय चौकशी करिता सिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तुत अर्जावर विचार करताना न्यायालय अभिलेखावरील कागदपत्रे त्यांच्या औपचारिक सिद्धतेशिवाय विचारात घेऊ शकते.

**०९.** वादींच्या कथनानुसार दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. ०१ ते ०५ यांच्या वडीलोपार्जीत एकत्रीत कुटुंबाच्या मिळकती आहेत. याउलट, प्रतिवादी क्र. ०१ व ०४ यांच्या कथनानुसार दावा मिळकती या प्रतिवादी क्र. ०१ यांच्या स्वकष्टार्जीत मिळकती आहेत. या ठिकाणी नमुद करण्यासारखी बाब म्हणजे वादी व प्रतिवादी यांच्यातील असलेले नातेसंबंध उभयंतांना मान्य

आहेत. प्रतिवादी क्र. ०१ व ०२ यांचा पहिला विवाह झाल्याचे व त्यांच्या विवाह संबंधातून त्यांना वादी क्र. ०१ व ०२ हे अपत्य असल्याची बाब प्रतिवादी क्र. ०१ व ०४ यांना मान्य आहे. वादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. ०१ व ०२ यांच्यामध्ये फारकत झालेली नसतांना प्रतिवादी क्र. ०१ यांना शांताबाई यांच्यासोबत असलेल्या विवाहबाहय संबंधातून प्रतिवादी क्र. ०४ व ०५ अशी अपत्य आहेत. याउलट प्रतिवादी क्र. ०१ व ०४ यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. ०१ व ०२ यांचा विवाह कायदेशीरित्या संपुष्ठात आल्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ याने शांताबाई यांच्यासोबत कायदेशीर विवाह केला व त्या विवाह संबंधातून प्रतिवादी क्र. ०४ व ०५ ही अपत्य आहेत. प्रतिवादी क्र. ०१ यांचा शांताबाई यांच्यासोबत झालेला विवाह कायदेशीर आहे किंवा नाही ही बाब पुराव्याअंती सिध्द होईल. सद्‌यपरिस्थितीत वादी क्र. ०१ व ०२ हे प्रतिवादी क्र. ०१ व ०२ यांच्या विवाहसंबंधातून असलेली अपत्य आहेत ही बाब प्रस्तुत अर्जाचा विचार करतांना महत्वपूर्ण ठरते.

**१०.** पुढील महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादी क्र. ०१, त्याचा भाउ विजयसिंह व बहीन दुर्गाबाई यांच्यामध्ये सन २००५ साली झालेले वाटप प्रतिवादी क्र. ०१ व ०४ यांना मान्य आहे. प्रतिवादी क्र. ०१ व ०४ यांच्या कथनानुसार सदर वाटपामध्ये त्या वाटपामध्ये प्रतिवादी क्र. ०१ याचा भाउ विजयसिंह व बहीन दुर्गाबाई यांनी दावा मिळकतींमधील त्यांचे हक्क मौजे शहापूर येथील १० एकर जमीन व वार्ड क्र. १७ मधील तिन मजली घर घेवून सोडून दिलेले आहेत. त्यामुळे दावा मिळकती प्रतिवादी क्र. ०१ यांच्या स्वकष्टार्जीत मिळकती आहेत. या ठिकाणी नमुद करावे लागेल की, प्रतिवादी क्र. ०१ आणि त्याचे भाउ विजयसिंह व बहीन दुर्गाबाई यांच्यामध्ये झालेल्या वाटपामध्ये विजयसिंह व दुर्गाबाई यांनी दावा मिळकतींमधील त्यांचे हक्क प्रतिवादी क्र. ०१ याच्या लाभात सोडून दिले असले तरी त्याबदल्यात त्यांनी वार्ड क्र. १७ मधील तिन मजली घर व मौजे शहापूर येथील १० एकर

जमीन घेतलेली आहे. सदर वार्ड क्र. १७ मधील घर अथवा शहापूर येथील १० एकर जमीन या प्रतिवादी क्र. ०१ यांच्या स्वकष्टार्जीत मिळकती होत्या असे प्रतिवादी क्र. ०१ यांचे कोणतेही कथन नाही. जे घर व शेत जमीन विजयसिंह व दुर्गाबाई यांना देण्यात आले त्या मिळकती देखील वडीलोपार्जीत होत्या ही बाब वादी व प्रतिवादी यांनी दाव्यात व लेखी कैफियतीमध्ये केलेल्या कथनावरुन प्रथमदर्शनी दिसून येते.

**११.** प्रतिवादीच्या वकीलांचा असा युक्तीवाद आहे की, वडीलांच्या हयातीत मुलांना वाटप करुन मागण्याचा अधिकार नाही व दावा मिळकती विक्री करण्याबाबत कायमस्वरुपी अथवा तात्पुरता मनाई हुकुम मागण्याचा अधिकार नाही. त्यांच्या युक्तीवादानुसार कुटुंबाचा कर्ता यास मिळकत विक्री करण्याचा अधिकार आहे. त्यांच्या युक्तीवादापृष्टयर्थ त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सुशिल कुमार व इतर विरुध्द राम प्रकाश व इतर (1988 AIR(SC) 576) या न्यायनिर्णयाचा हवाला दिला आहे. उपरोक्त न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालयाने खालील प्रमाणे न्यायतत्व सांगितले आहे.

The power of a manage for an infant heir to charge ancestral estate by loan or mortgage, is by the Hindu Law, a limited and qualified power, which can only be exercised rightly by the Manger in a case of need, or for the benefit of the estate. But where the charge is one that as prudent owner wold make in order to benefit the estate, a bonafide lender is not affected by the precedent mismanagement of the estate. The actual pressure on the estate, the danger to be averted, or the benefit to be conferred, in the particular instance, or the criteria to be regarded. If that danger arises from any misconduct to which the lender has been a party, he cannot take advantage of his own wrong to support a charge in his favour against the heir, grounded on a

necessity which has own wrong has helped to cause.

१२. निश्चितच, कुटुंबाचा कर्ता यास कुटुंबाच्या आवश्यक गरजेपोटी एकत्र कुटुंबातील मिळकत विक्री करण्याचा अधिकार आहे. उपरोक्त न्यायनिर्णयामध्ये एकत्र कुटुंबातील सदस्याने केवळ त्यातील दावा मिळकत कुटुंबाचा कर्ता याने विक्री करु नये असा कायमस्वरुपी मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केला होता. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ०१ यांनी दावा प्रलंबीत असतांना कोणत्याही कौटुंबीक गरजेपोटी प्रतिवादी क्र. ०६ यांच्या हक्कात दावा मिळकतीचा काही भाग विक्री केला होता असे प्रतिवादींचे कोणतेही कथन नाही. याउलट, दावा मिळकती एकत्र कुटुंबाच्या मिळकती असल्याचे प्रतिवादी क्र. ०१ व ०४ यांनी स्पष्टपणे नाकारले आहे. त्यामुळे उपरोक्त मा. सर्वोच्च न्यायालयासमोर असलेले प्रकरण व प्रस्तुत प्रकरणातील तथ्य वेगवेगळे आहेत. त्यामुळे उपरोक्त न्यायतत्व प्रस्तुत प्रकरणात लागू होणार नाही. याउलट वादींनी त्यांची भिस्त मा. मद्रास उच्च न्यायालयाच्या एस. संपुर्णम विरुध्द सी.के. शानमुगम व इतर (Second Appeal No.729/2016 dated 05/04/2022) या न्यायनिर्णयाचा हवाला दिला आहे. त्यामध्ये मा. मद्रास उच्च न्यायालयाने असे नमुद केलेले आहे की, मुलगा अथवा मुलगी यांच्या जन्मानंतर त्यांना वडीलोपार्जीत मिळकतीमध्ये हक्क प्राप्त होतो. प्रस्तुत प्रकरणातील दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. ०१ ते ०५ यांच्या स्वकष्टार्जीत मिळकती असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

१३. मिळकत विक्री करण्याविरूध्द तात्पुरता मनाई आदेश हा पक्षकाराला त्याच्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्यास प्रतिबंधित करते. जेव्हा प्रतिवादी हे दाव्यातील न्यायनिर्णयाच्या पुर्वी दावा मिळकत विक्री करतील अशी भिती वादीला असते त्यावेळेस असा मनाई हुकुम मागितला जावु शकतो. दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी असलेल्या नोंदीचा फायदा घेउन दावा मिळकती

विक्री करू नयेत असा तात्पुरता मनाई हुकुम वादींनी मागितलेला आहे. दावा मिळकतींमध्ये त्यांचा अविभाज्य हिस्सा असल्याचे वादींचे कथन आहे व सदरची बाब सकृतदर्शनी दिसून येते. प्रतिवादी क्र. ०१ यांनी प्रस्तुत दावा प्रलंबीत असतांना दावा मिळकतीपैकी ८१ आर जमीन प्रतिवादी क्र. ०६ यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३१९/२०२३ अन्वये विक्री केलेली आहे. प्रतिवादींनी यापुढे देखील दावा मिळकत विक्री केल्यास वादींचे नुकसान होणार आहे. त्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो वादींच्या हक्काचे रक्षण होणे आवश्यक आहे. दाव्याचा अंतिम निकाल काहीही होवो, परंतु सदर निकाल होईपावेतो वादींच्या हक्काचे रक्षण करण्याची जबाबदारी न्यायालयाची आहे. दाव्याच्या निकालापर्यंत दावा मिळकती प्रतिवादींनी कोणालाही हस्तांतरीत करू नये अथवा विक्री करू नये अशी मागणी वादींनी केलेली आहे. प्रतिवादी हे दावा मिळकती त्रयस्थ व्यक्तीस विक्री करण्याच्या तयारीत असल्याचे वादींचे स्पष्ट कथन आहे व तसे दिसून आलेले आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींनी दावा मिळकतींमध्ये त्रयस्थ व्यक्तींचे हितसंबंध निर्माण केल्यास अथवा दावा मिळकत विक्री केल्यास वादींच्या हक्कास बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच, दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे. एकंदरीत वादींचे कथन पाहता सकृतदर्शनी केस वादींच्या हक्कात दिसुन येते. सबब वादप्रश्न क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>वादप्रश्न क्रमांक २ करिता</u> :-**

**१४.** प्रस्तुत वादप्रश्नात समाविष्ट असलेला घटक न्यायाचा समतोल (*Balance of convenience*) म्हणजे तुलनात्मक अपाय अथवा पक्षकारांची होणारी गैरसाय होय. न्यायाचा समतोल कोणाच्या बाजूने आहे हे निश्चित करण्यासाठी अंतरिम मनाई हुकूमाचा अर्ज नामंजूर केल्यास अर्जदारांना किती अपाय होईल या बाबीसह सदर अर्ज मंजूर केल्यास सामनेवाल्यांना किती अपाय होईल या बाबीचा देखिल विचार करणे आवश्यक असते.

**१५.** वादप्रश्न क्रमांक १ च्या विवेचनानुसार दावा मिळकती त्यांच्या वडीलोपार्जीत व एकत्र कुटुंबाच्या मिळकती असल्याचे व प्रतिवादी हे दावा मिळकतींमध्ये त्रयस्थ व्यक्तींचे हितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून आलेले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा मनाई अर्ज नामंजूर केल्यास वादींना जो काही अपाय होईल त्यापेक्षा निश्चितच कमी अपाय सदर मनाई अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींना होईल. त्यायोगे न्यायाचा समतोल वादींच्या लाभात असल्याचे शाबीत करण्यास त्यांना यश आलेले आहे. सबब वादप्रश्न क्रमांक २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>वादप्रश्न क्रमांक ३ करिता</u> :-**

**१६.** वादप्रश्न क्रमांक ३ मध्ये समाविष्ट असलेला घटक अपरिमित नुकसान (Irreparable injury) म्हणजे पैशाने कधीही भरून न येणारी हानी होय. जाणीवपूर्वक पुन्हा उल्लेख करावासा वाटतो की, वादग्रस्त मिळकती वादी व प्रतिवादी क्र. ०१ ते ०५ यांच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकती असल्याचे सकृतदर्शनी न्यायालयासमोर आलेले आहे. अशा परिस्थितीत वादींचे नुकसान होणार आहे. तसेच, दावा मिळकती ही प्रतिवादींच्या नावे महसुल दप्तरी असल्याचा फायदा घेउन त्रयस्थ व्यक्तीमार्फत हितसंबंध निर्माण करण्याची भिती असल्याचे वादींनी त्यांच्या अर्जात नमुद केले आहे. दाव्याच्या गुणदोषावरील निकालाकरीता बराच वेळ लागणार आहे. अशा परिस्थितीत वादींचे दावा मिळकतीशी असलेले संबंध जपणे देखील आवश्यक आहे. त्यामध्ये त्रयस्थ व्यक्तींचे हितसंबंध निर्माण केल्यास वादींचे अतोनात नुकसान होईल व प्रकरणामध्ये गुंतागुंत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रस्तुत मनाई अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादींपेक्षा वादींची जास्त प्रमाणात अपरिमित हानी होईल. सबब वादप्रशन क्रमांक ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**वादप्रश्न क्रमांक ४ करिता :-**

**१७.** सकृतदर्शनी केस (*Prima facie case*), न्यायाचा समतोल (*Balance of convenience*) आणि अपरिमित नुकसान (*Irreparable injury*) या तिन्ही संज्ञा केवळ अंलकारिक भाषेचा नमुना नसून सदर तिन्ही संज्ञांना विशिष्ट महत्व आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सदर तिन्ही संज्ञा वादींच्या लाभात असल्याचे शाबीत करण्यास त्यांना यश आलेले असल्यामुळे वादप्रश्न क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात आलेले आहेत. त्यामुळे प्रस्तुत मनाई अर्ज मंजूर करण्याच्या योग्यतेचा आहे. त्यासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत दाव्याच्या निकालापर्यंत दावा मिळकती प्रतिवादींनी विक्री करू नये अथवा त्रयस्थ व्यक्तींचे हितसंबंध निर्माण करू नयेत असा तात्पुरता मनाई हुकुम जारी करण्यात येत आहे.

३ खर्च दाव्यात.

स्वा/-

दिनांक २४/१०/२०२४

(सुभाष द. तारे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मंगरुळपीर